**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

आस्था/जन-९८/२०२५-२६/२७६९ १६ जानेवारी, २०२६

प्रति,
मा. प्रधान सचिव
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

विषय : श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत सादर करावयाच्या माहितीबाबत...

महोदय,

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत सादर करावयाच्या माहिती खालील प्रमाणे:

| दिर्घकालीन उद्दिष्टे | | | गुणांकन |
|---|---|---|---|
| ०१ | आकृतीबंध | कार्यालयाचा सुधारीत आकृतीबंध सुधारीत करण्यात आला आहे का?<br>शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध सुधारीत करण्याचे काम विद्यापीठ स्तरावर पुर्ण करुन उच्च व तंत्रशिक्षण विभागास सादर केलेला आहे. प्रत सोबत जोडत आहे. | ०५ |
| ०२ | सेवाप्रवेश नियम | कार्यालयातील एकुण संवर्गापैकी किती संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत व अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली याचे प्रमाण<br>शिक्षकीय संवर्गासाठी विद्यापीठाने मंजूर केलेला गॅझेट, कायदा (Statute)] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनयम आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश यांच्या आधारे नियुक्ती करण्यात येते. तर शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी प्रमाण संहिता आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील तरतुदीनुसार नियुक्ती करण्यात येते. विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचा-यांचे सेंवाप्रवेश नियम भरती प्रक्रियेच्या वेळी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आलेली प्रत सोबत जोडत आहोत. | ०५ |
| ०३ | सर्व संवर्गाची जेष्ठतासूची प्रसिध्द् करणे | विद्यापीठ प्रत्येक वर्षी शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी प्रकाशीत करते. सन २०२४ पर्यंतच्या सेवाजेष्ठता यादया प्रकाशीत केलेल्या आहेत व त्यानुसार पात्र कर्मचा-यांना पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत. | १० |
| ०४ | पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती | शिक्षकेतर पदांवर प्रत्येक वर्षी १०० टक्के पदोन्नती देण्यात येते. केवळ ज्या संवर्गातील अधिकरी/कर्मचारी सेवानिवृत्त होतात तीच पदे त्यावर्षीच्या सेवाजेष्ठता यादीत रिक्त दिसून येतात. | १० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती | कार्यालयात सरळसेवा नियुक्तीमधील रिक्त पदांचे प्रमाण विद्यापीठाने शिक्षकीस संवर्गासाठी शासनाकडून मिळालेल्या ८५ पदे भरण्याची मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार जाहिरात जाहिरात देण्यात आली आहे. लवकरच पद भरती करण्यात येईल. सोबत जाहिरात जोडत आहोत.<br><br>तसेच शिक्षकेतर शासनास आढावा सादर केला आहे. शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तात्काळ पद भरती करण्यात येईल. रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरूपातील ३०० अस्थायी कर्मचा-यांना सेवेत घेतले आहे. सोबत जाहिरात जोडत आहोत. | ०४ |
| ०६ | बिंदूनामावली प्रमाणीकरण | कार्यालयात एकुण संवर्गापैकी किती संवर्गाच्या बिंदूनामावली प्रमाणित करून घेतल्या आहेत.<br><br>शिक्षकीय संवर्गातील एकुण १३ मधील सर्व सर्वंगाच्या बिंदूनामावली प्रमाणित करून घेतल्या आहेत. शिक्षकेतर संवर्गातील २०१८ पर्यंतच्या सर्व संवर्गाच्या बिंदूनामावली प्रमाणित करून घेतल्या आहेत. १०० टक्के पदोन्नती असलेल्या बिंदूनामावली मा.व.क.कक्षाने वेळ दिल्यानंतर पुर्ण करण्यात येतील. | १० |
| ०७ | अनुकंपा नियुक्ती | अनुकंपा तत्वावरील सर्व प्रकरणे मा. सहसंचालक कार्यालयास मंजूरीसाठी पाठविण्यात आल्याने विद्यापीठ स्तरावर १०० टक्के काम पुर्ण झालेले आहे. प्रत सोबत | १० |
| ०८ | iGOT पार्टलवर रजिस्ट्रशन व ५ कोर्स पूर्ण करणे | कार्यालयातील कर्मचा-यांपैकी किती कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पार्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे.<br><br>कार्यालयातील कर्मचा-यांपैकी १०० टक्के कर्मचा-यांचे केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे.<br><br>कार्यालयातील कर्मचा-यांपैकी किती कर्मचा-यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर ०५ कोर्स पूर्ण केले आहेत.<br><br>०५ कोर्सचे प्रशिक्षणाचे देण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. ६० टक्के प्रशिक्षण पुर्ण केले आहे. व उर्वरीत प्रशिक्षण येत्या ०२ दिवसात १०० टक्के प्रशिक्षण पुर्ण करण्यात येईल. | ०८ |
| ०९ | सर्व कर्मचा-यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे | विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन ०१/०७/२०२५ पर्यंतचे वार्षिक वेतनवाढी तसेच रजेच्या नोंदी अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. शिक्षकीय संवर्गाचे देखील सेवापुस्तक अद्ययावत करण्यात आलेली आहेत. प्रत सोबत.<br><br>त्याचबरोबर त्याचे **Digitization** करून प्रत **Digital** मध्ये उपलब्ध आहे. | २० |

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

C:\Users\admin\Desktop\New Microsoft Word Document.docx